रविवार, दि. ८ मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १८७ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

चंद्राबाबू सरकारची नवी योजना

## तिसरे अपत्यासाठी २५ हजार निधी, १२ वीपर्यंत शिक्षणही मोफत

**हैदराबाद -** जगातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून भारताने चीनला मागे टाकत पहिलं स्थान पटकावले आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतात नेहमीच मुले जन्माला घालण्यावरुन चर्चा होत असते. कुणी हिंदूंनी १० मुले जन्माला घातली पाहिजे, असे म्हणतो, तर कुणी ४ मुले जन्माला घालण्याचा सल्ला देतो. विशेष म्हणजे भारत सरकारने हम दो-हमारे दो म्हणत दोन मुलांच्या जन्मासाठीच आग्रह धरला आहे. मात्र, आता आंध्र प्रदेश सरकारकडून तिसऱ्या मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाणार आहे. राज्यातील जन्मदर घटत असल्याने आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी थेट विधानसभेतच याबाबतची घोषणा केली. राज्य सरकारने लोकसंख्येसंदर्भात नवी नीती आखत असून दुसऱ्या आणि तिसऱ्या अपत्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे.

दक्षिण भारतातील काही राज्यांत जन्मदर सातत्याने घटत असल्याचं आकडेवारीवरुन समोर येत आहे. त्यामुळेच, काही राज्य सरकारने लोकसंख्या कमी करण्याऐवजी संतुलन कायम ठेवण्यासाठी योजना आखत आहे. त्यानुसार, आंध्र प्रदेश सरकार तिसऱ्या अपत्यास २५,००० रुपये प्रोत्साहन अनुदान देणार असल्याची माहिती आहे.

**२५ हजारांची प्रोत्साहन मदत**

आंध्र प्रदेशच्या चंद्राबाबू नायडू यांच्या प्रस्तावित नव्या लोकसंख्या नितीनुसार, दुसरे किंवा तिसरे अपत्य जन्मलेल्या पालकांना २५००० रुपये प्रोत्साहन निधी दिला जाईल. तसेच, तिसऱ्या अपत्यासाठी विशेष सुविधा देण्याचीही संकल्पना आहे. त्यानुसार, तिसऱ्या मुलास वयाच्या ५ वर्षांपर्यंत दरमहा १००० रुपये, वयाच्या १८ वर्षांपर्यंत मोफत शिक्षण देण्याचा सरकारचा मानस आहे. या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळाल्यास अधिक मुलांसाठी दाम्पत्य विचार करतील, असे सरकारला वाटते. विशेष म्हणजे, मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत सरकारची नवी लोकसंख्या नीती निश्चित केली जाईल. त्यानंतर, १ एप्रिल पासून नवी लोकसंख्या निती योजना सुरू होऊ शकते.

भविष्यात राज्यातील लोकसंख्या संतुलन कायम ठेवण्यास आणि लोकसंख्या जन्मदराची घट कमी करण्यात शासनाची ही योजना महत्त्वाची ठरेल. या योजनेसह महिलांनाही विशेष सवलत देण्यात येणार आहे. सरकार मातृत्व सेंटर ऑफ एक्सीलेंस स्थापन करणार आहे, जेथे आधुनिक आरोग्य सुविधा आणि आयवीएफ () सारख्या सेवा दिल्या जातील. यांसह प्रत्येक ५० मुलांसाठी एक चाइल्ड केअर सेंटरही उभारण्यात येईल. महिलांच्या सुविधांसाठी पिंक टॉयलेट बनविण्यात येईल. तर, कर्मचारी महिलांसाठी विशाखापट्टनम येथे १७२ कोटींची खर्च करुन मोठं हॉस्टेल उभारण्यात येणार आहे. तसेच, सिजेरियन डिलीवरी कमी करण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

## जालना शहरातील मूलभूत सुविधांचा आढावा

महापौर, उपमहापौरांसह माजी आमदारांचा पाहणी दौरा

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीत मिळाव्यात यासाठी जालना महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध प्रभागांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला. शनिवारी (दि. ७ मार्च) सकाळी महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, माजी आमदार कैलास गोरंट्याल आणि माजी नगराध्यक्ष संगीता गोरंट्याल यांनी शहरातील विविध भागात भेट देत पाणीपुरवठा, स्वच्छता, नाली व्यवस्था आणि दिवाबत्तीच्या कामांचा आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान अनेक प्रभागांमध्ये नागरिकांकडून पाणीपुरवठा अनियमित असणे, नाल्यांची स्वच्छता न होणे तसेच काही ठिकाणी दिवाबत्ती बंद असल्याच्या तक्रारी समोर आल्या. या पार्श्वभूमीवर महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने दुरुस्ती आणि स्वच्छतेची कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनीही नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि प्रकाशव्यवस्था यांसारख्या सुविधा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. महानगरपालिकेच्या विविध विभागांनी परस्पर समन्वय ठेवून तक्रारींचे त्वरित निराकरण करावे, असेही त्यांनी सांगितले.



या पाहणीमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या पायाभूत सुविधांबाबत प्रशासन अधिक सतर्क राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शहरात स्वच्छता आणि पाणीपुरवठा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने या पाहणी दौऱ्याकडे महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

या वेळी नगरसेवक संतोष माधववाले, नगरसेवक रोहित भुरेवाल, नगरसेवक वीरेंद्र धोका, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, आनंद झारखंडे यांच्यासह बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग व स्वच्छता विभागाचे प्रमुख तसेच महानगरपालिकेचे विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**प्रत्यक्ष पाहणीमुळे प्रशासनाला गती मिळण्याची अपेक्षा**

शहरातील अनेक समस्या कागदोपत्री राहतात आणि त्यावर कार्यवाही उशिरा होते, अशी नागरिकांची नेहमीच तक्रार असते. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधी स्वतः विविध प्रभागात जाऊन परिस्थितीचा आढावा घेत असल्याने प्रशासनावर काम पूर्ण करण्याचा दबाव निर्माण होतो. विशेषतः उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे आणि स्वच्छतेकडे लक्ष देणे ही महानगरपालिकेसमोरील मोठी जबाबदारी आहे.

यामुळे या पाहणी दौऱ्यानंतर शहरातील मूलभूत सुविधांबाबत प्रत्यक्ष सुधारणा दिसून येते का, याकडे आता जालना शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## आ.खोतकर यांच्या प्रयत्नांतून मतदारसंघातील ग्रामीण रस्त्यांसाठी ३२ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील रस्ते मजबूत व दर्जेदार करण्यासाठी आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे अर्थसंकल्पातुनव नाबार्ड मधुन एकूण ३२ कोटी रुपयांच्या विविध रस्ते सुधारणा कामांना निधी/मंजुरी मिळाली आहे. या निधीमुळे मतदारसंघातील अनेक गावांना जोडणारे महत्त्वाचे रस्ते दुरुस्त होणार असून ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे.

मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये भोकरदन जालना रामनगर सावरगिव- हाडप रस्ता (रा.मा. २२३) किमी ५१/00 ते ५१/५०० या भागातील रस्ता सुधारणा करण्यासाठी २ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच पोखरी सि. ते नाव्हा बाजीउम्रद सेवली (प्रजिमा १०) किमी ४०/००० ते ४५/००० या रस्त्याच्या सुधारणा कामासाठी ६ कोटी २० लाख रुपये मंजूर झाले आहेत.

गोलापांगरी दुधना काळे गाव हिस्वन कारला हिवरा रोशनगाव ते प्रामा ०२ (प्रजिमा १७) किमी १४/००० ते २१/००० या रस्त्याच्या सुधारणेसाठी ७ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच जालना दरेगाव ढोकसाळ (प्रजिमा १८) किमी ०/००० ते ७/५०० या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणा कामासाठी ८ कोटी २० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

याशिवाय पिरपिंपळगाव वंजारउम्रद गोंदेगाव (प्रजिमा ०९) किमी ३०/००० ते ३१/५०० या रस्त्याच्या सुधारणेसाठी १ कोटी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. तसेच तालुका जालना रा.मा. २२३ ते रामनगर मानेगाव जैतापूर (प्रजिमा ११) या रस्त्याच्या किमी ०५/00 ते ७/५०० भागासाठी २ कोटी रुपये आणि किमी १४/५०० ते २१/००० या भागासाठी ४ कोटी ७१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या सर्व कामांमुळे जालना तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था सुधारून गावांमधील संपर्क अधिक सुलभ होणार आहे. शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना या रस्त्यांचा मोठा फायदा होणार असून वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होईल.

### विकासासाठी सातत्याने पाठपुरावा - आमदार खोतकर



जालना विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विविध विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांनी सांगितले. ग्रामीण भागातील रस्ते सुस्थितीत असणे हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे मतदारसंघातील ग्रामीण रस्त्यांच्या सुधारणा कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. या कामांमुळे गावागावांमधील संपर्क अधिक सुलभ होणार असून शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पुढील काळातही जालना मतदारसंघातील विकासकामांसाठी आवश्यक निधी मिळवून अधिकाधिक कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, या विकास कामांना अर्थसंकल्प व नाबार्ड मधून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे सुनित्रात्राताई पवार सार्वजनिक बांधकाम मंत्री माननीय नामदार शिवेंद्रराजे भोसले यांचे आमदार खोतकर यांनी आभार व्यक्त केले.

जागतिक महिला दिन

## जालन्यात माता-किशोरी मेळावा व कविसंमेलन; कार्यक्रमाची मांदियाळी

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा महिला व बालविकास कार्यालय आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात विविध भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये माता-किशोरी मेळावा, निमंत्रितांचे कविसंमेलन, व्याख्यान आणि अनुभव कथन अशा विविध उपक्रमांचा समावेश असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी दिली आहे.

दिमाखदार उद्घाटन सोहळा

शहरातील रेल्वेस्टेशन रोड परिसरातील जिल्हा परिषद मुलांच्या प्रशालेच्या प्रांगणात असलेल्या कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात हा सोहळा पार पडणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर वंदनाताई अरुणराव मगरे यांच्या हस्ते होईल. याप्रसंगी शिक्षणाधिकारी संगीता भागवत, नगरसेविका संध्याताई देठे, नगरसेविका मंगलताई गरदास यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे असतील.

साहित्यिक आणि प्रबोधनात्मक मेजवानी

महिला दिनाचे औचित्य साधून सकाळी ९ वाजता प्रसिद्ध कवयित्री रेखा गतखणे-जाधव यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन रंगणार आहे. यामध्ये डॉ. सुहास सदाव्रते, कैलास भाले, डॉ. प्रभाकर शेळके यांच्यासह अनेक नामवंत कवी आपला सहभाग नोंदवतील.

कविसंमेलनासोबतच विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे:

सशक्त कुटुंब-प्रगत कुटुंब: विधिज्ञ कल्पना त्रिभुवन

मुलगी घडविताना पालकांची भूमिका: दामोधर घोरपडे

करिअर मार्गदर्शन: श्याम चव्हाण


सुरक्षामंत्र व कायदेशीर हक्क: संजय सोनवणे

अनुभव कथन आणि संवाद

कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे मानेगाव येथील सुनीता जाधव आणि योगिता खांडेभराड यांचे अनुभव कथन. या माध्यमातून महिलांच्या संघर्षाचा आणि यशाचा प्रवास उपस्थितांसमोर उलगडला जाणार आहे.

नियोजनासाठी परिश्रम: या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. रवींद्र काकडे, सुनील ढाकरके, अरुण देशमुख, दीपक दहेकर, सपना देवकर आणि स्नेहा बनकर यांची संयोजन समिती विशेष परिश्रम घेत आहे.

## महिलांनी स्वत:च्या क्षमतेची जाणीव ठेवून ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावेत - जिल्हाधिकारी मित्तल




**जालना । प्रतिनिधी -** महिलांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून जीवनात मोठी ध्येये निश्चित करावीत आणि ती साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत तसेच आजच्या बदलत्या जागतिक परिप्रेक्ष्यात महिलांसाठी शिक्षण, उद्योग, तंत्रज्ञान आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत असून विद्यार्थिनींनी या संधींचा योग्य प्रकारे उपयोग करून आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व भारतीय खेल प्रधिकरण यांचे सयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त दि. ०६ मार्च २०२६ रोजी क्रीडा संकुल, जालना येथे आयोजित कार्यक्रमा दरम्यान त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास आरोग्य तज्ञ, शासकीय आरोग्य महाविद्यालय श्रीमती स्मिता पंडित, प्राचार्य, मत्स्योदरी लॉ कॉलेज, जालना डॉ. शेख तरन्नुम, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांची उपस्थिती होती. सामान्य रुग्णालय नर्सिंगचे शिक्षण घेत असलेल्या पान २ वर

देवमूर्ती येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात संपन्न

## शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती; अर्ज स्वीकृती व समस्यांचे निराकरण

**जालना । प्रतिनिधी -** देवमूर्ती येथे आज आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला परिसरातील शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेतली.

या शिबिराला श्रीमती मनीषा देशपांडे उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, श्री रमेश मिसाळ अपर जिल्हाधिकारी, श्री गहिनीनाथ कापसे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना तसेच श्री विष्णू राठोड तालुका कृषी अधिकारी, जालना यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी व





कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. मान्यवरांनी कृषी विभागाच्या स्टॉलला भेट देऊन विविध योजनांची माहिती घेतली. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, पीएम किसान योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, ॲग्रीस्टॅक तसेच इतर विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच शेतकऱ्यांकडून विविध योजनांचे अर्ज स्वीकारण्यात आले व त्यांच्या कृषी विषयक अडचणी ऐकून त्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी मदत झाली.

## संपादकीय पान

# प्रतिनिधी महिला निर्णय मात्र इतरांचे?

८ मार्च रोजी साजरा होणारा आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिलांच्या सशक्तीकरणाचा आणि समान अधिकारांचा संदेश देणारा दिवस मानला जातो. समाजातील प्रत्येक क्षेत्रात महिलांना समान संधी मिळावी, त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले जावे आणि त्यांचे नेतृत्व विकसित व्हावे, हीच या दिवसामागील खरी भावना आहे. मात्र प्रत्यक्ष परिस्थितीकडे पाहिले असता अनेक ठिकाणी महिलांना मिळालेले प्रतिनिधित्व केवळ कागदोपत्री राहिल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. या निर्णयामुळे महिला राजकारणाच्या मुख्य प्रवाहात आल्या. गावपातळीपासून शहरांपर्यंत महिलांनी नेतृत्व स्वीकारण्याची संधी मिळाली, ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे. जालना शहर महानगरपालिकेतही जवळपास तेहेतीस महिला सदस्य आहेत आणि महापौर पद देखील एका महिलेकडे आहे. महिला नेतृत्वाच्या दृष्टीने ही बाब अभिमानास्पद मानली जाते. परंतु या सकारात्मक चित्राच्या पाठीमागे एक वेगळीच चर्चा सध्या पुढे येत आहे. काही ठिकाणी निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींच्या कामकाजात त्यांच्या कुटुंबातील पुरुष पती, मुलगा, भाऊ किंवा इतर नातेवाईक यांची हस्तक्षेपात्मक भूमिका असल्याची चर्चा होत आहे. एवढेच नव्हे तर या संदर्भात तक्रारीही करण्यात आल्याचे बोलले जात आहे. लोकशाही व्यवस्थेत जनतेने मत देऊन निवडून दिलेला प्रतिनिधी हा स्वतः निर्णय घेण्यासाठी सक्षम असला पाहिजे. जर निवडून आलेल्या महिलांच्या जागी त्यांच्या कुटुंबातील पुरुष निर्णय घेत असतील, तर ते महिला सशक्तीकरणाच्या मूलभूत संकल्पनेलाच विरोध करणारे ठरते. आरक्षणाचा उद्देश महिलांना केवळ पद मिळवून देणे नसून त्यांना नेतृत्व, आत्मविश्वास आणि निर्णयक्षमता विकसित करण्याची संधी देणे हा आहे. जालना महानगरपालिकेत जवळपास तेहेतीस महिला सदस्य आहे. मात्र या महिलांना स्वतंत्रपणे काम करण्याची संधी मिळाली तरच या प्रतिनिधित्वाचा खरा अर्थ पूर्ण होईल. महिलांनी स्वतःच्या मतांनुसार निर्णय घेतले, नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवला आणि प्रशासनावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवले, तरच लोकशाही अधिक मजबूत होईल. महिला प्रतिनिधींनीही आपल्या जबाबदाऱ्या जाणून घेत सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक आहे. समाजातील महिला नेतृत्व बळकट होण्यासाठी आत्मविश्वास, अभ्यासू वृत्ती आणि स्वतंत्र विचारसरणी अत्यंत महत्त्वाची आहे. त्याचबरोबर कुटुंबीयांनीही महिलांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे; परंतु त्यांच्या जागी निर्णय घेणे किंवा त्यांच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप करणे टाळले पाहिजे. महिला दिनाच्या निमित्ताने एक महत्त्वाचा संदेश समाजाने स्वीकारण्याची गरज आहे. महिलांना केवळ प्रतिनिधी बनवू नका, तर त्यांना खऱ्या अर्थाने निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य द्या. ज्या महिलांना जनतेने विश्वासाने निवडून दिले आहे, त्या महिलांना काम करण्यासाठी संपूर्ण स्वातंत्र्य आणि आदर मिळाला पाहिजे. खऱ्या अर्थाने महिला दिन साजरा करायचा असेल तर महिलांना केवळ मंचावर सन्मानित करण्यापेक्षा त्यांच्या नेतृत्वाला संधी देणे आणि त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

पान १ वरुन

### महिलांनी स्वतःच्या ...

विद्यार्थी, जिल्हा परिषद कर्मचारी, समाज कल्याण हॉस्टेल कर्मचारी, संकुलावर प्रशिक्षणासाठी नियमित येणारे महिला आणि खेळाडू यांच्यासाठी समुपदेश मार्गदर्शन,महिलांचे आरोग्य बाबत, समुपदेश मार्गदर्शन , कायदेशीर अधिकार व सक्षमीकरण व मनोरंजनात्मक खेळ / रस्सीखेच / लगोरी / बास्केटमध्ये बॉल टाकणे /संगीतखुर्ची/ या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ पारंपरिक क्षेत्रांपुरते करिअर मर्यादित राहिलेले नाही. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल क्षेत्र, संशोधन, स्टार्टअप्स तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध क्षेत्रांमध्ये महिलांसाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थिनींनी आत्मविश्वासाने या क्षेत्रांकडे वळून आपल्या क्षमतांचा विकास करावा.त्या पुढे म्हणाल्या की, कृत्रिम बुद्धिमत्ता ( ), डेटा सायन्स, रोबोटिक्स, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग यांसारख्या आधुनिक विषयांमध्येही मोठ्या प्रमाणात करिअरच्या संधी उपलब्ध होत आहेत. या क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचीही संधी उपलब्ध होत आहे.विद्यार्थिनींनी आपल्या आवडी-निवडी ओळखून योग्य दिशेने शिक्षण घ्यावे, कौशल्य विकासावर भर द्यावा आणि बदलत्या काळानुसार नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. शिक्षणासोबतच आत्मविश्वास, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन या गुणांच्या बळावर महिलांना कोणतेही ध्येय गाठणे शक्य असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी श्रीमती स्मिता पंडित, आरोग्य तज्ञ, शासकीय आरोग्य महाविद्यालय यांनी महिलांनी आपल्या आरोग्याबाबत विशेष जागरूक राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी महिलांना संतुलित आहाराचे महत्त्व पटवून देत विविध आजार व त्यावर उपयुक्त आहाराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच डॉ. शेख तरन्नुम, प्राचार्य, मत्स्योदरी लॉ कॉलेज, जालना यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायद्याचे ज्ञान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. महिलांनी आपल्या हक्कांविषयी माहिती घेतल्यास त्यांना समाजात अधिक सक्षमपणे उभे राहता येईल, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी लागू असलेल्या विविध कायद्यांबाबतही माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उदय वोडके (तालुका क्रीडा अधिकारी), लता लोंढे (क्रीडा अधिकारी), आरती चिल्लारे (क्रीडा अधिकारी), सिद्धार्थ कदम, आशीष जोगदंड (क्रीडा मार्गदर्शक), अमोल मस्के, संतोष प्रसाद (वरिष्ठ लिपिक), राहुल राठोड (कनिष्ठ लिपिक), राहुल गायकवाड, हसन खान यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सोपान शिंदे, सचिन मोहिटे आणि निसार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# सामाजिक जीवनात महिलांचे मोलाचे स्थान

आज दिनांक ८ मार्च हा जागतिक महिला दिन संपूर्ण जगात साजरा होत आहे. त्यानुसार आपणही हा दिवस साजरा करीत असतो.आजच्या युगात महिलांनी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने फार मोठे महत्वाचे व मानाचे स्थान समाजात प्राप्त केलेले आहे.हे संपूर्ण जगाला माहितच आहे.

आजच्या तंत्रज्ञान युगात औद्योगिक क्रांती झाली या क्षेत्रात तसेच ग्रामीण व शहरी भागातील क्षेत्रातही महिलांचा फार मोठा सिंहाचा वाटा आहे,असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.तसे पाहाता ग्रामीण भागात स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण पुरुषापेक्षा खूपच कमी कमी आहे असे दिसून येते.आजही ग्रामीण भागात स्त्रियां कष्टाळू असून पुरुषांप्रमाणे संस्कृतीत घरातील स्वयंपाकासह धुणीभांडी,मुलांचे संगोपन इत्यादी अनेक प्रकारचे कामे सांभाळून शेती व्यवसायातही बरीचशी कामे सतत करीत असतात.आज महिलांनी आपल्या कर्तृत्वावर विविध क्षेत्र काबीज केलेली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात महिलांचा समावेश झालेला दिसून येतो.

महिलांनी मनावर घेतले तर कोणतेही क्षेत्र यशस्वीपणे काबीज करू शकतात हे महिलांनी अनेकदा सिद्ध करून दाखविले आहे. शेती,उद्योग,शिक्षणाचा प्रसार - प्रचार याशिवाय पुरुषाचा सहभागही महिलांना सक्षमतेकडे नेऊ शकतो. स्त्री ही कष्टाने परिस्थिती बदलवू शकते.तीच सुसंस्काराची पिढी निर्माण करू शकते. ती एक महान तपस्वी असुन कुनी कन्या,कुणाची माता,कुणाची पत्नी इत्यादी पवित्र नाते संबंधातील महत्वाची शृंखला असून प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात ऐक प्रेरणास्रोत निर्माण करते. आजही म्हणतात,''जिचे हाती पाळण्याची दोरी,ती जगाते उद्धरी.'' घार हिंडे आकाशी तिचे चित्त पिलापाशी, म्हणूनच संपूर्ण परिवाराची कुटुंब व्यवस्था तीच पहाते. विशेषतः ग्रामीण भागात रानावनातून जळाऊ लाकडे, पाणी,दूध,तसेच किराणा,बाजार, दळण नित्योपयोगी दैनंदिन घरकामे करून शेतावर जाणे,मजुरी करणे इत्यादी अनेक उपक्रम सांभाळत उदरनिर्वाह करिता स्त्रि यांना अमाप कष्ट सोसावे लागतात.

शेती व्यवसाय पेरणीसह शेतात तन काढण्यापासून पिकांना खते देणे,पाणी,देने पीक कापणे, पशु पालन, शिक्षण,आरोग्य,परिवहन इत्यादी विभागात अनेक स्त्रियांनी पुरुषापेक्षा सरस कामगिरी केलेली आहे.भारतातील आसाम राज्यात तर चहाच्या मळ्यात चहाची पाने तोडण्यापासून,कोळसा खाणीत कामे करणे,समुद्रकिनाऱ्यावरील मिठागरे,खनिजे शोधणे,जहाजात बसून मासेमारी,रानात मध गोळा करणे,रेशीम उद्योग,बिडी उद्योगासह, कारखान्यामध्ये कुशल कारागीर म्हणून स्त्रियांचा मोलाचा सहभाग आहे.सध्या शहरी भागातील महिला विशेषतः ग्रामीण भागातील राहणाऱ्या एकापेक्षा जास्त महिला समूहाचे गट करून विविध महिला बचत गटांची स्थापना झाली असून शासनाच्या विविध पत-पुरवठा संस्था,बँकेकडून कर्ज घेऊन आर्थिक मदतीने किंवा स्वबळावर शेती पासून विविध वस्तूचे उत्पादन करून कच्च्या मालावर प्रक्रिया करून देशात व विदेशात विविध वस्तूंची(मालाची) निर्यात करून स्वावलंबी होत आहे.ही त्यांच्या यशाची भरारी आहे.

महिलांच्या सक्षमीकरणास हातभार - महिला स्वयंसहायता बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळण्याच्या उद्देशाने प्रत्येक विभाग,जिल्हा,तसेच तालुकास्तरावर विक्री प्रदर्शन आयोजित करून महिला सक्षमीकरणासाठी शासन प्रयत्नशील आहे. अशा महोत्सवातून ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास हातभार लागणार आहे.

आजमितीला केंद्रात व विविध राज्यातील जिल्ह्यांमध्ये ग्रामीण महिला स्वयंसहायता गटांचे स्टॉल लावण्यात येतात,यात आवळा प्रक्रिया, विविध प्रकारचे खाद्य पदार्थ,मसाले, लाकडी खेळणी,पितळी दिवे,हस्तकलेच्या व विणकामाच्या वस्तू, धोंगडी,कापडी पिशव्या,झाडू,टोपल्या, फडे इत्यादी.तसेच ग्रामीण भागातील राहणाऱ्या कारागिरांनी तयार केलेल्या चप्पल बूट,प्रसिद्ध चिवडा, चिप्स, आयुर्वेदिक उत्पादने,अगरबत्ती, चहा,भाकरी, ठेचा थापडे,दही,खवा,खवय्यांसाठी खास अस्सल ग्रामीण मराठमोळ स्वादिष्ट पदार्थांची मेजवानी प्रदर्शनाचे आकर्षण ठरत आहे.या वेळी बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्याची चांगली संधी मिळते.त्यासाठी विविध बचत गटांना राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार वितरण सोहळाही आयोजित करण्यात येतो.या महोत्सवाच्या माध्यमातून सुरू केलेली महिला सक्षमीकरणाची आणि सामाजिक उपक्रमांची चळवळ सामाजिक क्रांती घडवणारी आहे.

शहरी भागातील महिलां तसेच विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना सर्व क्षेत्रात प्रतिनिधित्व देऊन देशाच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने विकास साधता येईल.नियमित बचतीमुळे महिलांच्या उद्योग कल्पनाशक्तीला आर्थिकदृष्ट्या सक्षम बळ मिळाल्याने बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्माण करणारे उद्योग जिल्हा प्रमाणेच राज्यातही मोठ्या प्रमाणात सुरू होत आहे,असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच सादर केलेल्या२०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला बळ देण्यासाठी अनेक तरतुदी जाहीर करण्यात आल्या आहेत.८ मार्च रोजी साजरा होणाऱ्या जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर केलेल्या या योजना महिलांच्या आर्थिक,सामाजिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.ग्रामीण महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करून समाजातील त्यांचा सन्मान व सहभाग अधिक बळकट करणे ही महाराष्ट्र राज्याच्या अर्थसंकल्पाची ठळक उद्दिष्टे आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत पात्र महिलांना १५०० रुपये दरमहा देण्यात येत असून राज्यात आता पर्यंत सुमारे २७ लाख महिला लखपती दीदी बनल्या आहेत.२०२६-२७ या वर्षात आणखी २५ लाख महिलांना लखपती दीदी बनविण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

केंद्र व राज्य शासना अंतर्गत महिलांसाठी पुढील विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात - लेक लाडकी योजना,महिला उद्योगिनी योजना, स्वरोजगार योजना,महिला उद्योजक धोरण योजना, महिला सन्मान योजना,महाराष्ट्र विधवा पेन्शन योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना,उज्ज्वला गॅस योजना,माझी कन्या-भाग्यश्री योजना,सुकन्या समृद्धी योजना, जननी सुरक्षा योजना, महिला समृद्धी कर्ज योजना

अशा प्रकारे या विविध कल्याणकारी योजना महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येतात.



**शंकर सरूबाई खंडू बावस्कर**
**माजी जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क विभाग**

# खामेनींसाठी दुखवटा हे एक दोन दिवसांसाठी जोश निर्माण करणारे !

खामेनींसाठी दुखवटा हे एक दोन दिवसांसाठी जोश निर्माण करणारे...!!

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा अमेरिका आणि इस्त्रायल यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाल्यानंतर भारतामध्ये त्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी आणि अमेरिका-इस्त्रायलचा निषेध करण्यासाठी ठिकठिकाणी मुस्लीम धर्मियांचे मोर्चे निघाले. काश्मीरमध्ये याला हिंसक वळण लागले. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करण्यात आली. पाकिस्तानातही असेच आक्रमक निषेध मोर्चे निघाले, त्यावेळी आंदोलकांनी अमेरिकेच्या वकिलातीत घुसून तोडफोड करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिथे तैनात असलेल्या अमेरिकी सैनिकांनी त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात आठ आंदोलक ठार झाले. खामेनी हे इराणचे जसे नेते होते, तसेच ते मुसलमानांच्या शिया पंथीयांचे धार्मिक प्रमुख होते. त्यामुळे त्यांना मानणारे जगभरात जे मुसलमान आहेत, त्यांनी काही ठिकाणी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. पण खामेनी यांचे धार्मिक नेते पद ही बाब सोडली तरी त्यांनी इराणची सत्ता हाती घेतल्यावर इराणमध्ये जे काही धार्मिक कट्टरवादी नियम लागू केले, त्यामुळे नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आली. विशेषतः महिलांचे व्यक्तिस्वातंत्र्य पार पायदळी तुडविले गेले. त्यामुळे खामेनी यांचा मृत्यू झाल्यानंतर आता तरी आपल्याला व्यक्तिस्वातंत्र्य मिळेल, मोकळेपणाने वावरता येईल, असे तिथल्या नागरिकांना वाटू लागल्याने त्यांनी नाचून गाऊन आनंद व्यक्त केला. अमेरिका आणि इस्त्रायलच्या इराणवर होत असलेल्या हल्ल्याचे इराणमधील नागरिकांना दुःख तर आहेच, कारण त्यामुळे त्या देशाचे नुकसान होत आहे, नागरिक मारले जात आहेत, पण त्याच वेळी धर्माच्या नावाने आपले अधिकार हिरावून घेणारे खामेनी गेले, याचाही त्यांना आनंद आहे. खामेनी हे शिया पंथीय होते. तसे पाहू गेल्यास इराण हा शिया पंथीयबहुल देश आहे. पण त्याच आखातात इराणच्या भोवती असलेले काही मुस्लीम देश हे सुन्नी पंथीय आहेत. त्यामुळे जरी आखातात मुस्लीम देश असले तरी त्यांच्या शिया आणि सुन्नी या पंथभेदामुळे वाद आहेत. यातील काही देशांनी शिया पंथीयांचे प्रमुख म्हणून खामेनी यांच्याविरोधात अमेरिका आणि इस्त्रायलला मदत केलेली होती, असे मानले जाते.

पॅलेस्टाईन आणि इस्त्रायल यांच्यातील युद्धात पॅलेस्टाईनमधील नागरिकांचे मोठ्या संख्येने बळी जात आहेत. युद्धामुळे अनेकांची उपासमार होत आहे. महिला-मुलांचे महिला-मुलांचे प्रचंड हाल होत आहेत, जगात अशा प्रकारे कुणाचे बळी जातात, हाल होतात तेव्हा त्याचा निषेधच करायला हवा, याबद्दल प्रश्नच नाही. जगातील कुठलाही सहृदयी माणूस अशा घटनांचा निषेधच करेलच. भारताने पॅलेस्टाईन आणि इस्त्रायलचे युद्ध थांबावे आणि त्या भागात शांतता प्रस्थापित व्हावी, अशीच अपेक्षा व्यक्त केलेली आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धामुळे युक्रेनचे अतोनात नुकसान झालेले आहे. इतकेच नव्हे तर हे मोठे देश असल्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थांचे नुकसान होते. युद्धांमुळे खरे तर कुणाचाच फायदा होत नाही, तरीही देशांमध्ये युद्धे होतात, माणसांमध्ये संघर्ष होतात, हाणामाऱ्या होतात. त्याला काही कारणे असतात, ती देशांशी आणि व्यक्तींशी संबंधित असतात. अयातुल्ला खोमेनी यांची हत्या झाल्यानंतर भारतातील मुस्लिमांनी ठिकठिकाणी मोठे मोर्चे काढले. त्यामुळे अनेकांना त्याचे आश्चर्य वाटले. अनेकांच्या मनात हाच प्रश्न निर्माण झाला की, इराण हा एक वेगळा देश आहे. तिथल्या प्रमुख नेत्याचा मृत्यू झाला, तर इथला मुसलमानांनी आपल्यातील शिया सुन्नी असा भेद विसरून इतक्या मोठ्या संख्येने मोर्चे काढण्याचे काय कारण आहे? मोर्चामध्ये सहभागी झालेल्या काहींनी तर अतिशय तीव्र भावना व्यक्त केल्या. ते मुस्लीम धार्मिक नेते आहेत, त्यामुळे आम्ही त्यांच्याविषयी दुःख व्यक्त केले, अशी त्यांची भावना होती, पण हे करत असताना आपण भारतीय समाजापासून वेगळे उठून दिसत नाही ना याचा विचारही त्यांच्या मनात आला नाही.

२०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान होऊन भाजपची बहुमताची सत्ता केंद्रात आल्यापासून मुस्लीम समाजामध्ये बरीच नाराजी आहे, ती ते विविध प्रसंगी व्यक्त करत असतात. आपल्या सरकारने कितीही सुविधा दिल्यातरी विशिष्ट समाज आपल्याला मते देणार नाही, हे आता भाजप आणि मोदी यांनाही कळून चुकलेले आहे. त्यातून मग हिंदूंच्या मतांचे ध्रुवीकरण करून ती आपल्याकडे वळवण्यासाठी एक है तो सेफ है, अशा घोषणा भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांकडून दिल्या जातात. जणूकाही मुस्लीम समाज हा इथला नागरिकच नाही. संपूर्ण देशाच्या एकतेसाठी अशी भावना निर्माण होणे हिताचे नाही. त्यामुळे समाज विभागला जातो. जेव्हा समाज विभागला जातो, तेव्हा देश विभागला जातो. त्याचा अनुभव भारतीयांनी १९४७ साली घेतलेला आहे. त्यामुळे भारतात राहताना आपल्याबद्दल इतर समाजामध्ये शंका निर्माण होणार नाही, याची आपण काळजी घ्यायला हवी. बरेच वेळा बाहेरच्या घटनेचे निमित्त असले तरी कारण आतले असते, आतली खदखद असते. त्यामुळे खामेनींच्या मृत्यूचे निमित्त असले तरी मुस्लिमांच्या मनात भाजपविरोधाची ही खदखद तर नाही ना, असाही प्रश्न उपस्थित होतो. कारण जेव्हा यापूर्वी भाजपने पाकिस्तानी आणि बांगलादेशी नागरिकांना परत पाठवण्याचा कायदा केला तेव्हा मुस्लिमांनी देशात विविध ठिकाणी शाहिन बाग आंदोलन चालवले. भारताची फाळणी झाल्यावर जे मुसलमान भारतात राहिले त्यांनी आम्ही इथे मिळून मिसळून राहू असे सांगितले होते. आता आपल्या भूमिकेमुळे इतरांच्या मनात शंका निर्माण होणार नाही याची त्यांनी काळजी घ्यायला हवी. कारण शक्तिप्रदर्शन हे एक दोन दिवसांसाठी जोश निर्माण करणारे असते, पण देश म्हणून एकत्र राहताना त्याचे दूरगामी दुष्परिणाम होत असतात.

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर**

# वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मताअभावी लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता होऊ शकत नाहीः मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पॉक्सो) दाखल झालेल्या खटल्यांमध्ये, केवळ वैद्यकीय अधिकाऱ्याने लैंगिक अत्याचाराबाबत निश्चित मत दिले नाही किंवा अहवालात तसा उल्लेख केला नाही, या एकमेव कारणावरून आरोपीला निर्दोष सोडता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. पीडितेची साक्ष, परिस्थितीजन्य पुरावे आणि इतर वैद्यकीय नोंदी यांसारखे पूरक पुरावे ग्राह्य धरले पाहिजेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निकालामुळे पॉक्सो कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल आणि पीडित बालकांना न्याय मिळण्यास मोठी मदत होईल, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केली आहे.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र जोशी यांच्या एकलपीठाने एका आरोपीची शिक्षा कायम ठेवताना हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. आरोपीने असा युक्तिवाद केला होता की, वैद्यकीय अधिकाऱ्याने त्याच्या साक्षीत लैंगिक अत्याचाराबद्दल कोणतेही मत दिले नाही किंवा पीडितेच्या शरीरावर कोणत्याही जखमांचा उल्लेख केला नाही. तथापि, न्यायालयाने वैद्यकीय प्रमाणपत्राची दखल घेतली, ज्यामध्ये पीडितेच्या गुप्तांगावर लालसरपणा () आल्याची नोंद होती. न्यायालयाने म्हटले की, लैंगिक अत्याचाराव्यतिरिक्त हा लालसरपणा येण्याचे दुसरे कोणतेही कारण रेकॉर्डवर नाही. अशा परिस्थितीत, केवळ वैद्यकीय अधिकाऱ्याने मत व्यक्त केले नाही म्हणून आरोपीला निर्दोष मुक्त करता येणार नाही. वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष ही केवळ एक तज्ञाचे मत असते आणि संपूर्ण खटल्याचा निकाल फक्त त्यावर अवलंबून असू शकत नाही.

ॲड. महेश एस. धनावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले की, ''उच्च न्यायालयाचा हा निर्णय पॉक्सो कायद्याच्या उद्दिष्टांना बळकटी देणारा आहे. अनेकदा वैद्यकीय अधिकारी लैंगिक अत्याचाराबाबत थेट किंवा निश्चित मत देण्यास टाळाटाळ करतात, ज्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा मिळण्याची शक्यता असते. मात्र, या निकालाने स्पष्ट केले आहे की, न्यायालयांनी केवळ तांत्रिक बाबींवर अवलंबून न राहता पीडितेची विश्वासार्ह साक्ष आणि इतर परिस्थितीजन्य पुराव्यांना महत्त्व दिले पाहिजे. पीडित बालकाची साक्ष सुसंगत असेल आणि तिला इतर पुराव्यांचा आधार मिळत असेल, तर ती शिक्षा देण्यासाठी पुरेशी आहे. यामुळे गुन्हेगारांना कायद्यातील पळवाटा शोधून सुटणे कठीण होईल.''

न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, पॉक्सो कायद्यांतर्गत बालकावरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात, पीडित बालकाच्या साक्षीला योग्य महत्त्व देणे आवश्यक आहे. जर रेकॉर्डवरील इतर पुरावे किंवा एकूण परिस्थिती पीडितेच्या दाव्याबद्दल कोणताही संशय निर्माण करत असेल, तरच न्यायालय सावधगिरी बाळगून इतर पूरक पुराव्यांचा शोध घेऊ शकते. या प्रकरणात, पीडितेची साक्ष तिच्या पूर्वीच्या जबाबाशी सुसंगत होती आणि तिला एका स्वतंत्र साक्षीदारासह वैद्यकीय पुराव्यांचाही आधार मिळत होता, हे रेकॉर्डवरील संपूर्ण पुराव्यांवरून दिसून येते, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात, प्रदीप बाईकर नावाच्या आरोपीने, जो पीडितेचा शेजारी होता, २२ ऑगस्ट २०१३ रोजी पीडित अल्पवयीन मुलीला काही खाद्यपदार्थ देण्याच्या बहाण्याने आपल्या घरी बोलावले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडितेने पोटदुखी असह्य झाल्याने २६ ऑगस्ट २०१३ रोजी हा प्रकार तिच्या आईला सांगितला, त्यानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सत्र न्यायालयाने त्याला दोषी ठरवून शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात आरोपीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते, जे न्यायालयाने फेटाळून लावले आणि त्याची शिक्षा कायम ठेवली. ॲड. धनावत यांनी शेवटी सांगितले की, ''हा निकाल न्यायव्यवस्थेचा पीडित-केंद्रित दृष्टिकोन दर्शवतो. जेव्हा एखादे बालक अत्याचाराला सामोरे जाते, तेव्हा त्याची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरते. केवळ वैद्यकीय अहवालात स्पष्ट मताचा अभाव असल्यामुळे अशा गंभीर गुन्ह्यातील आरोपी सुटता कामा नये, हा संदेश या निकालातून समाजात आणि कायदेशीर वर्तुळात गेला आहे, ही एक अत्यंत सकारात्मक बाब आहे.''

‘नववर्ष प्रण-सुरक्षित अन्न’ मोहिमेचा समारोप

## दर्जेदार रेस्टॉरंट्सचा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते गौरव

**जालना । प्रतिनिधी -** अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या संकल्पनेतून आणि आयुक्त श्रीधर डुबे-पाटील यांच्या निर्देशानुसार दि. २४ डिसेंबर ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली होती. नूतन वर्षाच्या स्वागतानिमित्त हॉटेलिंगसाठी बाहेर पडणाऱ्या खवय्यांना सुरक्षित आणि स्वच्छ अन्न मिळावे, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या ‘नववर्ष प्रण-सुरक्षित अन्न’ मोहिमेचा समारोप झाला. या मोहिमेत स्वच्छतेचे निकष पाळणाऱ्या जालना शहरातील पहिल्या तीन रेस्टॉरंट्सना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रशासनाने शहरातील लहान, मध्यम आणि मोठ्या अशा सर्वच स्तरातील रेस्टॉरंट्सची कसून तपासणी केली. यामध्ये केवळ अन्नाचा दर्जाच नाही तर किचनची अंतर्गत रचना आणि कार्यपद्धती, कर्मचाऱ्यांची वैयक्तिक स्वच्छता आणि त्यांचे प्रशिक्षण, अभिलेख जतन करण्याची पद्धती, हॉटेलची देखभाल आणि दुरुस्ती आदि तांत्रिक बाबींचीही पडताळणी करण्यात आली. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील इतर हॉटेल व्यावसायिकांनाही आपले मानांकन सुधारण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या निकषांची चोख अंमलबजावणी करणाऱ्या जिल्ह्यातील तीन आस्थापनांनी बाजी मारली आहे. यामध्ये प्रथम क्रमांक सिद्धार्थ सेठी यांचे मे. सिद्धार्थ द फर्न, द्वितीय क्रमांक वरद मोहता यांचे मे. रसोई प्युअर व्हेज रेस्टॉरंट आणि तृतीय क्रमांक विनीत साहनी यांचे मे. हॉटेल विजय विलास यांनी पटकाविला आहे. या सोहळ्याचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन अन्न सुरक्षा अधिकारी अश्विनी तांबे यांनी केले.

## शिवजयंतीनिमित्त ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना ‘‘शिवराज्य पुरस्कार’’

### रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे** - सालाबादप्रमाणे यंदाही तिथीनुसार शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी शिवराज्य प्रतिष्ठान, छत्रपती शिवाजी महाराज रोड, पुणे यांच्या वतीने शिवजन्म सोहळा पारंपरिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यंदा प्रतिष्ठानच्या २० व्या वर्षपूर्ती निमित्त ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना ‘‘शिवराज्य पुरस्कार’’ देऊन सन्मानित करण्यात आले. मानाची सरदार पगडी, शाल-श्रीफळ व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

इतिहास संशोधन आणि त्याचा प्रसार हेच जीवनध्येय ठेवत कार्य करणारे बलकवडे यांनी नुकतीच वयाची ६६ वर्षे पूर्ण केली आहेत. ते सिंहगड विजेता नरवीर नावजी बलकवडे यांचे वंशज असून भारत इतिहास संशोधक मंडळ, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, श्री शिवचरित्र जागर समिती तसेच बालभारती अशा अनेक प्रतिष्ठित संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषविली आहेत. तसेच ते मोडी लिपीचे अभ्यासक म्हणूनही ओळखले जातात.

या प्रसंगी बोलताना बलकवडे म्हणाले की, ‘‘आजची तरुण पिढी पारंपरिक पद्धतीने शिवजयंती साजरी करत असतानाच सामाजिक भान ठेवून विविध उपक्रम राबवत आहे. माँ जिजाऊंची प्रेरणा घेऊन आजच्या महिला सर्व क्षेत्रांत अग्रेसर होत आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रेरणेने प्रतिष्ठानचे कार्यकर्ते इतिहासाच्या विकृतीकरणाविरुद्ध काम करत आहेत, याचा आनंद वाटतो.’’ यावेळी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आशिष हिंगमिरे यांनी प्रास्ताविक केले.

दरवर्षीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मोफत छातीचा एक्स-रे व विविध आरोग्य तपासण्याही करण्यात आल्या. या उपक्रमांमध्ये तब्बल २१६ नागरिकांनी सहभाग नोंदवला. शिवराज्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून आतापर्यंत ६००० हून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले आहे. उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा भासतो याची जाणीव ठेवून समाजासाठी काहीतरी देण्याच्या भावनेतून प्रतिष्ठान विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

सकाळी ७.३० वाजता शिवछत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबिरास प्रारंभ झाला. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास भेटवस्तू स्वरूपात ‘‘मसाज गन’’ देण्यात आली. दुपारी १२ वाजता शिवजन्म सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानच्या महिला कार्यकर्त्यांनी पेढे वाटून शिवजन्माचा आनंद साजरा केला.

यंदा प्रतिष्ठानच्या वतीने ‘‘इतिहासाची शौर्यगाथा’’ या नावाने शिवकालीन नाणी आणि शस्त्रास्त्रांचे विशेष प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तसेच सायंकाळी ७ वाजता बाल-शिवभक्तांसाठी महावतार नरसिम्हा या चित्रपटाचे प्रेक्षण आयोजित करण्यात आले. मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला आणि अल्पोपहारासह कार्यक्रमाची सांगता झाली. या




वेळी परिसरातील मान्यवर आणि नगरसेवकांनी प्रतिष्ठानला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

यामध्ये दीपक (बाबा) मिसाळ, नगरसेवक राघवेंद्र बापू मानकर, स्वरदा बापट, स्वप्नाली पंडित, ऐश्वर्या थोरात, मानसी मनोज देशपांडे, स्नेहा नामदेव माळवदे, गणेश कल्याणकर, राजेंद्र काकडे, अजय भोसले, शिरीष मोहिते, राम बांगड, सौरभ बाळासाहेब अमराळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष लतिश शिंदे, उपाध्यक्ष प्रसाद तेलंग, कार्याध्यक्ष प्रशांत मोरे, खजिनदार अविनाश करंजावणे तसेच प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# साधनेद्वारे आत्मतेज जागवणे, हे खरे सबलीकरण !

गेल्या काही वर्षांपासून स्त्री-मुक्ती किंवा महिला सबलीकरण हे विषय चर्चेत आहेत. महिलांचे सबलीकरण हा विषय बहुतांश वेळा आधुनिकीकरण किंवा पाश्चात्त्य अन संस्कृतीविरोधी विचारसरणीच्या प्रभावाने चर्चिला जातो. अमर्यादित स्वातंत्र्य म्हणजे मुक्ती अशी अयोग्य संकल्पना तथाकथित पुरोगामी आणि संस्कृतीविरोधक यांच्याकडून ठसवण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे आज अनेक महिला, युवती अयोग्य वाटेवर चालल्या आहेत. त्यांना खऱ्या उन्नतीच्या मार्गावर आणायचे असेल, तर अयोग्य संकल्पनांचे जोखड उतरवून टाकून त्यांना योग्य दिशा द्यावी लागेल. ही दिशा संस्कृतीचे अनुसरण आणि धर्माचरण करण्याच्या संदर्भात आहे; कारण साधना करून मिळणारे आत्मतेजच व्यक्तीच्या व्यावहारिक आणि पारलौकिक उन्नतीचा मार्ग प्रशस्त करते.

**हिंदु धर्मात महिलांचे स्थान**

भारतीय संस्कृतीत महिलांवर अनेक बंधने होती. अलीकडच्या काळात विशेषतः त्यांना शिक्षण मिळू लागल्यावर महिलांना अनेक अधिकार प्राप्त झाले, असा अपप्रचार अनेक जणांकडून केला जातो; पण अभ्यास केल्यावर वस्तुस्थिती वेगळी असल्याचे लक्षात येते. भारतीय संस्कृतीने किंवा सनातन हिंदु धर्माने कोणावरची अन्याय करण्याची कधीही शिकवण दिली नाही, उलट कायम वसुधैव कुटुम्बकम किंवा सर्वेत्र सुखिनः सन्तु अशी प्रार्थना केली आहे. मनुस्मृतीमध्ये यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । म्हणजे ज्या ठिकाणी नारीची पूजा होते, तेथे देवता रममाण होतात, असे म्हटले आहे. हिंदु धर्माने महिलांना कधीही उपभोग्य वस्तू मानले नाही. उलट हिंदु धर्माने स्त्रीला आदिमाया शक्तीचे रूप मानले आहे. विवाहानंतर कोणतीही पूजा पत्नीच्या सहभागाविना पूर्ण होत नाही. हिंदु धर्मामध्ये देवतांची नावेही लक्ष्मी-नारायण, सीता-राम, राधे-श्याम, गौरी-शंकर अशा प्रकारची आहेत. जेथे स्त्रियांना पुरुषांपेक्षाही उंच स्थान दिले आहे, तेथे स्त्री-पुरुष समानतेच्या गोष्टी करणे म्हणजे स्त्रियांचे अवमूल्यन करण्यासारखे आहे. महिलांसाठी एक दिवस नाही, तर प्रत्येक दिवसच हिंदु धर्माने दिला आहे. देवतांची नावे उच्चारतानाही प्रथम देवींना वंदन करणारा धर्म अन्यायकारक आहे, असे म्हणणे हा निवळ हिंदुद्वेष आहे, हे लक्षात घ्यायला पाहिजे.

**विद्वान, शूर आणि कर्त्या महिला**

भारतीय संस्कृतीत अनेक विद्वान, पराक्रमी, कुशल महिला होऊन गेल्या. महाभारतीय युद्धात काश्मीर राजा ठार झाल्यानंतर त्याची पत्नी यशोमती हिचा राज्याभिषेक स्वतः भगवान श्रीकृष्णाने केला होता. अर्जुनाची एक पत्नी चित्रांगदा मणिपूर राज्याची राणी होती. राम वनवासात निघाले, तेव्हा राजगुरु वसिष्ठ ऋषींनी सीता राज्यकारभार करण्यास कुशल आणि सक्षम असल्याने तिचाच राज्याभिषेक करावा, असे सुचवले होते; मात्र सीतेने रामासह वनवासात जाण्याची अनुज्ञा मागितल्याने तिने राज्यकारभार केला नाही, असा उल्लेख वाल्मीकि रामायणात आहे. तात्पर्य हिंदु धर्माने कधीही स्त्रीला कर्तेपणापासून रोखलेले नाही. पुराणांमध्ये अनेक विदुषींचे उल्लेख आढळतात. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा आदी विदुषी वेद-शास्त्रामध्ये पारंगत होत्या. माता कैकेयीचे वर्तन कसेही असले, तरी दशरथ राजासह कैकेयेही युद्धात शस्त्र हाती धरून लढाई करत असल्याचे वर्णन आहे. अलीकडच्या काळातील उदाहरण पाहायचे म्हटले, तर राणी लक्ष्मीबाई या युद्धशास्त्रात पारंगत होत्या. देशप्रेमाने ओतप्रोत असल्यानेच चिमुकल्या बाळाला पाठीला बांधून त्या युद्ध लढायला गेल्या. शहाजीराजे कर्नाटकमध्ये असतांना राजमाता जिजाई यांनी पुणे जहागिरीचा राज्यकारभार सांभाळला. छत्रपती राजारामाची पत्नी राणी ताराबाई यांनी कर्त्या होऊन कोल्हापूर संस्थान




स्थापन केले होते. अहल्याबाई होळकर पतीनिधनानंतर होळकर घराण्याच्या कर्त्या झाल्या होत्या. थोडक्यात शूर-वीर, विद्वान महिलांची परंपरा भारताला लाभली आहे.

या परंपरेचे पाईक व्हायचे असेल, तर आपल्यातील गुणांचा विकास करून त्रुटींवर आणि न्यूनगंडावर मात केली पाहिजे. तोकडे किंवा पाश्चात्त्य कपडे म्हणजे आधुनिकपणा, इंग्रजी बोलणे म्हणजे पुढारलेपण अशा अंधश्रद्धा झटकून टाकल्या पाहिजेत. स्वैराचारासारख्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यांमध्ये भेद आहे. तो समजून घ्यायला हवा. कुटुंबव्यवस्था हे भारताचे बलस्थान आहे. स्त्री ही कुटुंबव्यवस्थेचा कणा आहे. हा कणा जेवढा कणखर असेल, तेवढी कुटुंबव्यवस्था सुदृढ राहील. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी अधिक प्रमाणात केली आहे. आज जगभरातील लोकही बॅक तो मदरहूड म्हणत कुटुंबव्यवस्था जोपासण्याचा प्रयत्न करत आहेत. आपणही शालीनता, सुसंस्कृतपणा टिकवून ठेवण्याचे संस्कार केले पाहिजेत.

**असुरक्षित महिला**

आज देशाच्या परिस्थितीचा विचार केला, तर महिला असुरक्षित आहेत. ज्या देशात एका महिलेच्या शीलरक्षणाच्या सूत्रावरून रामायण, महाभारत घडले, त्या देशात आज प्रतिदिन शेकडो महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार वर्ष २०१९ मध्ये भारतात महिलांवरील हिंसाचाराच्या संदर्भात ४.०५ लाख घटनांची नोंद झाली. यातील ३० टक्के घटना या घरगुती हिंसाचाराच्या आहेत, तर ८ टक्के घटना बलात्काराच्या आहेत. ऑक्सफेम या जागतिक विश्लेषण संस्थेने भारतात प्रत्येक १५ मिनिटाला एका मुलीवर बलात्कार होत असल्याचे म्हटले आहे. देशात वर्ष २०१८ मध्ये बलात्काराच्या ३४ सहस्र घटनांची नोंद झाली. ८५ टक्के प्रकरणात आरोप निश्चित झाले; पण शिक्षा केवळ २७ टक्के लोकांना होऊ शकली, असे या अहवालात म्हटले आहे. धर्मशिक्षणाच्या अभावी अनेक हिंदु युवती आज लव्ह जिहादची शिकार होत आहेत.

रामराज्यामध्ये महिला मध्यरात्रीची दागिने घालून एकटी जाऊ शकत असे. आज तशी स्थिती नाही; कारण आज रामराज्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजच्या काळातही महिलांकडे वाकड्या दृष्टीने पाहणाऱ्या रांझ्याच्या पाटलाला हात-पाय तोडले जाण्याची शिक्षा मिळाली होती. आज त्वरित शिक्षा होणे तर दूरच; पण पीडित महिलेची तक्रारही सहजासहजी नोंदवली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. केवळ कठोर कायदे करून ही स्थिती पालटली जाणार नाही, तर त्यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न व्हावे लागतील.

**शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक सक्षमता**

महिलांना खऱ्या अर्थाने सक्षम बनवायचे असेल, तर शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक अशा ३ स्तरांवर उपाय करावे लागतील. प्रसिद्धीच्या स्टंटपायी गाभाऱ्यात घुसल्याने महिलांचे सक्षमीकरण होत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. महिलांना शारीरिक स्तरावर सक्षम बनवण्यासाठी त्यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर त्यासाठी प्रयत्न होऊ शकतात; पण केवळ शारीरिक सक्षमता पुरेशी नाही. प्रसंगांना सामोरे जाण्याचे मनोबल आणि आत्मबल आवश्यक असते. हे बळ साधना आणि धर्माचरण याद्वारेच प्राप्त होऊ शकते. आज अनेक जणी, अगदी विवाहित महिलाही कपाळावर लाल गोल कुंकू लावायची लाज बाळगतात. आधुनिकतेच्या नावाखाली पारंपरिक भारतीय पेहराव सोडून तोकडे कपडे घालतात. अशा प्रकारे उच्छृंखल वागण्याने मनोबल आणि आत्मबल प्राप्त होऊ शकणार नाही, तर हे बळ मिळवण्यासाठी साधनाच करावी लागेल. भक्ती आणि साधनेचे बळ असल्यानेच संत मीराबाई यांच्यावर जीवघेणी संकटे ओढवली, तरी श्रीकृष्णाने त्यांचे अद्भुतरित्या रक्षण केले. भक्तीमध्येच शक्ती आहे, हे लक्षात घेऊन आपली भावभक्ती वाढवायला हवी. साधनेद्वारे आत्मतेज जागवणे, हे खरे सबलीकरण आहे, हे लक्षात घ्यायला हवे. राजमाता जिजामाता, झाशीची राणी लक्ष्मीबाई, देवी अहिल्याबाई होळकर, राणी चेन्नम्मा यांच्या आदर्शांवर चालणे, हेच खरे सशक्तीकरण आहे.

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४०१**

# ‘‘महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षित’’

८ मार्च आंतरराष्ट्रीय महीला दीवस हा महीलांसाठी प्रेरणादायी ठरला पाहिजे.कारण जगातील महिलांनी पुर्वीच्याकाळी काय संघर्ष केला आणि आता कसा संघर्ष करावा लागत आहे याची आठवण ८ मार्चच्या निमित्ताने दिसून येते.महीला दिनाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व आम नागरिकांनी स्विकारली पाहिजे.कारण महीला ही प्रत्येकांची आई,मुलगी,बहिण,पत्नी,वैनी, आत्या, मामी, माउशी, आजी, सुन,सासु,काकु इत्यादी मानसन्मानाची उपमा व मानाचे पद आहे त्याचे पालन सर्वांनीच करायला हवे.यामुळे महीलांमध्ये व समाजामध्ये मोठी उर्जा निर्माण होवून एक नवीन चालना मिळुन शकते.देशात किंवा जगात महीलांची एक महत्वपुर्ण भुमिका असते.आज देश स्वतंत्र्या पासुन तर देशाच्या विकासापर्यंत महीलांचा मोठा हातभार लागला आहे.देश विकासाच्या दृष्टीकोणातुन आज महीला अग्रेसर आहेत.परंतु २१ व्या शतकात महीला स्वतःला असुरक्षित समजतात ही चिंताजनक बाब आहे. आज महीला सुरक्षा विभाग,खेळ विभाग, उद्योग क्षेत्र आणि अनेक सरकारी व खासगी क्षेत्रात महिला मोठ्या प्रमाणात दीसुन येतात.अनेक निवडणुकांमध्ये महीलांसाठी आरक्षणसुध्दा आहे.परंतु पुरूष प्रधान देशात राजकीय पुढाऱ्यांनी महीलांना अजुनपर्यंत पुर्ण स्वतंत्र दील्याचे दीसत नाही.लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये अजुन पर्यंत महीलांना सरकारने आरक्षण जाहीर केलेले नाही.ही महीलांच्या प्रती शोकांतिकाच म्हणावी लागेल.खालच्या स्तरावरील निवडणुकांमध्ये महीलांना आरक्षण आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु उच्चस्तरीय राजकारणात सरकारने महीलांना कोसो दुर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.भारतात रनरागीनी झाशीची राणी लक्ष्मीबाई पासुन तर आतापर्यंत महीलांनी देशाला स्वातंत्र्याकरीता, सुजलाम्-सुफलाम करण्याकरीता आणि देशाला विकासाच्या नविन शिखरावर नेण्याचे काम भारतीय महीलांनी नेहमीच केले आहे ही आनंदाची,गौरवाची व अभिमानास्पद बाब आहे.त्याच प्रमाणे देशहीताच्या कामासोबत भारतीय संस्कृतीचे जतन कसे केले पाहिजे याची शिकवणसुध्दा ‘‘महीलांपासुनच‘‘सर्वांना मिळत असते.कथेच्या माध्यमातून किंवा गोष्टींच्या आधारे वृध्द महिला बालगोपालांना ‘‘संस्कृतीचा‘‘पाठ शिकवित असतात.म्हणुनच देश घडविण्याकरीता पुरूषांचा जीतका वाटा आहे तीतकाच वाटा महीलांचा आहे.त्यामुळे ८ मार्च हा दीवस महीलांसाठी नविन दीशा ठरणारा सिध्द व्हायला पाहिजे.सेवाभावी संस्था, डॉक्टर,नर्स,पायलट, वकील, राष्ट्रपती,जज, पोलिस विभागा आणि आता महीलांना आर्मीमध्येसुध्दा मोठ्या प्रमाणात प्राधान्य देण्यात येत आहे.म्हणजेच आजची महीला पुरूषांच्या बरोबरीने चालुन देशाला नवीन दीशा देण्याचे काम करीत असल्याचे मी समजतो.पुर्वी महीलांना अनेक क्षेत्रात स्वतंत्र नव्हते. परंतु आधुनिक युगात महीला सक्षम आहे.त्यामुळे संपूर्ण क्षेत्रात महिला अग्रेसर असल्याचे दिसून येते.महीला राष्ट्रपती,महीला मुख्यमंत्री,महीला प्रधानमंत्री, वैज्ञानिक, लोकसभा अध्यक्ष, पोलिस कमिशनर, उपमुख्यमंत्री, अंतराळवीर,इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण पदांवर महीला विराजमान होत्या,आहे आणि पुढेही राहु शकतात याला नाकारता येत नाही. महीलांच्या या महत्त्वपूर्ण पदांमुळे भारतात महीलांनी इतिहास सुध्दा घडविला आहे. माओवादग्रस्त भागासाठी आदीवासी भागातील माडिया जमातीतील डॉ. कोमल मडावी ही एक प्रेरणादायी महीला ठरली तीची स्तुती कराल तीतकी कमी पडेल.आज भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात महिलांनी आपले नाव लौकीक केले आहे. राजकारण, समाजकारण, सुरक्षा, चित्रपट सृष्टी, खेळजगत,आर्मि, वैज्ञानिक, शास्त्रज्ञ, वैमानिक इत्यादीसह अनेक क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा महीलांनी भरारी मारली आहे आणि प्रत्येक देशातील महीलांनी आपल्या देशाचे नाव लौकीक करून सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय महीलांनी सर्वच स्तरात उंच भरारी मारली आहे त्याचसोबत भारतीय संस्कृती टीकवुन ठेवण्याची महत्वपूर्ण भुमिका भारतीय महिलांचीच आहे.महीलांचा वाढता विकास ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून व जगाच्या दृष्टीकोनातून स्वागतार्हबाब आहे.परंतु भारतात महीलांवर वाढते अत्याचार रोखण्यासाठी देशातील राज्य सरकारे असमर्थ असल्याचे दिसून येते.या करीता महीलांवरील वाढता अत्याचार पहाता सरकारने ‘‘फास्ट ट्रॅक‘‘कोर्ट अंमलात आणुन महीलांवर होत असलेले अत्याचार यावर अंकुश लावला पाहिजे.कारण आजच्या(सोशल मिडियाच्या) मोबाईलच्या युगामुळे महीलांवरील अत्याचार वाढत आहे.कारण महीलांवरील अत्याचार पहातो किंवा ऐकतो तेव्हा अंगावर शहारे येतात अशा अनेक घटना भारतात घडलेल्या आहे.मुलींचे अपहरण, अत्याचार किंवा त्यांची हत्या यावर पुर्णतः अंकुश लावण्याची गरज आहे.आंतरराष्ट्रीय महीला दीवसाच्या निमित्ताने महीलांच्या सुरक्षेला सर्वात जास्त प्राधान्य सरकारने द्यायला पाहिजे. ‘‘महीला सुरक्षित तर देश सुरक्षित,देश सुरक्षित तर जग सुरक्षीत‘‘ तेव्हाच खऱ्याअर्थाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाला महत्त्व येईल.मानवाने मानुसकीचे पालन केले तर महीलांवरील अत्याचारावर आपोआपच अंकुश लागु शकतो. ज्या प्रमाणे महीला मुलांचे संगोपन करते त्याचप्रमाणे महीलांच्या सुरक्षेची जबाबदारी मानवाने स्वीकारली पाहिजे. तेव्हाच महीला सुरक्षित राहू शकतात.कारण महीलांवरील अत्याचार हा गंभीर आणि चिंतेचा विषय आहे. त्यामुळे देशाच्या व जगाच्या दृष्टीकोनातून ही धोक्याची घंटा आहे.आज भारताचा विचार केला तर महीला अत्याचाराच्या लाखो केसेस कोर्टामध्ये प्रलंबित आहेत आणि महीलांवरील अत्याचाराच्या अनेक केसमध्ये ‘‘तारीख पे तारीख‘‘असा लपंडाव सुरू आहे. त्यामुळे गुन्हेगारांना वेळेवर सजा व पिडीतेला वेळेवर न्याय मिळत नाही ही शोकांतिका आहे.यावरून स्पष्ट होते की आजच्या परिस्थितीत महीला सुरक्षित नाही.८ मार्च महीला दीवसाचे औचित्य साधून भारतासह संपूर्ण जगाने महीला सुरक्षेचा ‘‘संकल्प‘‘केला पाहिजे आणि महीलांच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीची वागणूक दिली पाहिजे.महीलांचा सन्मान म्हणजे नारी जातीचा सन्मान,नारी जातीचा सन्मान म्हणजे देशाचा सन्मान,देशाचा सन्मान म्हणजे आंतरराष्ट्रीय महीला दीनाचा सन्मान.यातच खऱ्याअर्थाने महीला सशक्तीकरण दीसुन येईल.म्हणुनच म्हणतात ‘‘बेटी बचाव बेटी पढाव‘‘. महीला देवी-देवतांच्या सान्नीध्यात राहुन आपला परीवार मंगलमय कसा राहील या दीशेने त्यांचे कार्य सुरू असते व संपूर्ण परीवाराची एक महीला आशेचे किरण घेऊन सर्वांना सावरण्याचा प्रयत्न करीत असते.त्यामुळे महीला उन्हात सावली देण्याचे,हीवाळ्यात उब देण्याचे काम परिवाराला करीत असते. त्यामुळे प्रत्येक महीलेला देवीच्याच रूपात पहायला पाहिजे. आज रशिया -युक्रेन युध्दा दरम्यान आपला देश वाचवीण्यासाठी आरपारची लढाई लढत आहे. यासाठी मुख्यत्वेकरून त्यांच्या पत्नींनी व मुलींनी सैनिकांचे मनोबल वाढवीले आहे.म्हणजेच मानसाचे मनोबल व धौर्य वाढवण्यासाठी महीलांची अतुट शक्ती असल्याचे दिसून येते. असे माझे स्पष्ट मत आहे.आंतराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महिलांना मी आग्रह व विनंती करतो की जगात व देशात बदलत्या हवामानामुळे वाढते प्रदूषण व जंगलतोड पहाता आजच्या दिवसाला प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे सर्वांना शुद्ध हवा, ऑक्सिजन, सावली व गुरांना चारा मिळण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित होईल.जय हिंद!जय भारत.

**रमेश कृष्णराव लांजेवार, मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.**

# भाजीच्या टोपलीतून उभी राहिलेली स्वाभिमानाची दुनिया; कष्टातून घडतंय महिला सशक्तीकरण

## महिला दिनानिमित्त भाजी व मटकी विकणाऱ्या महिलांची जिद्द; स्वावलंबनातून कुटुंबाचा संसार सांभाळत समाजाला देतायत प्रेरणा

**दीपक शेळके**

**जालना -** ८ मार्च हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्याचा आणि त्यांच्या सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा दिवस असला तरी समाजातील अनेक महिलांसाठी प्रत्येक दिवस हा संघर्षाचा आणि स्वावलंबनाचा असतो. शहरातील रस्त्याच्या कडेला, बाजारपेठेत किंवा गल्लीबोळात फळे-भाजीपाला आणि मटकी विकणाऱ्या महिला या त्याचे जिवंत उदाहरण आहेत.

सकाळी पहाटेच घरातील कामे उरकून या महिला बाजारातून भाजीपाला किंवा मटकी आणतात आणि टोपली, हातगाडी किंवा छोट्या स्टॉलच्या माध्यमातून दिवसभर विक्री करतात. उन्हाळा, पावसाळा किंवा हिवाळा अशा कोणत्याही ऋतूमध्ये त्यांचा हा संघर्ष थांबत नाही. दिवसाला मिळणाऱ्या थोड्याफार उत्पन्नावर त्या स्वतःचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत.

**संघर्षातून घडलेले स्वावलंबन**

अनेक महिलांना आर्थिक परिस्थितीमुळे किंवा कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमुळे काम करणे भाग पडते. काही महिलांच्या पतींचे उत्पन्न अपुरे असते, तर काहींच्या कुटुंबात त्या एकट्याच कमावत्या असतात. अशा वेळी भाजी विक्री किंवा मटकी विक्री हा त्यांच्यासाठी स्वावलंबनाचा मार्ग ठरतो.

या महिलांच्या कष्टामुळे घरातील मुलांचे शिक्षण, रोजचा खर्च आणि इतर गरजा पूर्ण होत असतात. काही महिला तर मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठीही या छोट्या व्यवसायातून पैसे साठवत आहेत.

**छोटा व्यवसाय, मोठा आत्मविश्वास**

भाजी किंवा मटकी विक्री हा व्यवसाय लहान वाटला तरी त्यामागे मोठी मेहनत असते. दररोज बाजारातून माल आणणे, ग्राहकांशी व्यवहार करणे, दिवसअखेर नफा-तोट्याचा हिशोब करणे अशा अनेक जबाबदाऱ्या त्या पार पाडतात. या प्रक्रियेमुळे त्यांच्यात आर्थिक व्यवस्थापनाची सवय आणि आत्मविश्वासही निर्माण होतो. महिला स्वतःच्या मेहनतीवर उभ्या राहत असल्यामुळे समाजात त्यांचा सन्मानही वाढतांना दिसतो. अनेक महिला एकमेकींना मदत करत आपापला व्यवसाय पुढे नेत आहेत.





(छाया - किरण खानापुरे)

**समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण**

महिला दिनाच्या निमित्ताने अशा महिलांकडे पाहिले तर खरी महिला सक्षमीकरणाची व्याख्या स्पष्ट होते. कोणत्याही मोठ्या पदावर किंवा व्यवसायात नसूनही त्या आपल्या कष्टातून स्वाभिमानाने जीवन जगत आहेत. समाजातील इतर महिलांसाठीही या प्रेरणादायी ठरत आहेत.

**महिला सशक्तीकरणाचा खरा अर्थ**

महिला सशक्तीकरण म्हणजे केवळ घोषणांपुरते मर्यादित नसून महिलांना स्वावलंबी बनवणे हा त्याचा खरा अर्थ आहे. शहरातील रस्त्यांवर भाजी व मटकी विकणाऱ्या या महिला आपल्या कष्टातून तो अर्थ प्रत्यक्षात साकार करत आहेत. त्यांच्या टोपलीत केवळ भाजी नसते, तर त्यात असते कुटुंबाची जबाबदारी, मुलांच्या भविष्यासाठीची स्वप्ने आणि स्वाभिमानाने जगण्याची जिद्द.

### अतिक्रमणाच्या नावाखाली यांचा बळी नको

आपल्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्यासाठी अनेक महिला या भाजी- फळ विक्रीसह विविध व्यवसाय करत आहेत. साधारण कुटुंबांमुळे रस्त्याच्या कडेला अथवा जागा मिळेल अशा ठिकाणी यांनी आपला व्यवसाय थाटलेला आहे. परिणामी अनेक वेळा जालना महानगर पालिकाकडून (पुर्वी नगर पालिकेकडूनदेखील) शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबविल्या जाते. याचा सर्वाधिक फटका या महिला व्यवसायिकांना बसतो. अतिक्रमण हटाव च्या नावाखाली यांचा बळी दिला जातो. व अतिक्रमणे हटविली जातात. महिला जिल्हाधिकारी, महिला महापौर, महिला आयुक्त असे असतांना या महिलांचा आता सन्मान होणे अपेक्षित आहे. अशा महिला व्यवसायिकांना कायमस्वरुपी योग्य त्या ठिकाणी जागा देऊन त्यांना मदत करणे गरजेचे आहे.

### प्रशासनाची अपेक्षित साथ

भाजी आणि मटकी विकणाऱ्या महिलांसाठी शहरात पुरेशी बाजारपेठ उपलब्ध आहे मात्र, त्या ठिकाणी स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि छत असलेली बसण्याची सोय उपलब्ध करून देण्याची गरज आहे. मुळात जालना शहरात असलेल्या विविध आठवडी बाजारात देखील विविध महिला व्यवसायिक आहेत. अशा आठवडी बाजारातून या महिलांकडून तेथे बसण्यासाठी कर आकारणी करण्यात येते. यासाठी जालना मनपा कडून वसुलीसाठी ठेके दिलेले आहेत. नुकतेच जालना शहर महानगर पालिकेला महिला महापौर मिळाल्या आहेत. त्यातच जिल्हाधिकारी तसेच महानगर पालिका आयुक्त देखील ह्या महिलाच आहेत. ज्या महिला आपल्या कुटुंबियांचा गाडा हाकण्यासाठी आठवडी बाजारात व्यवसाय करत आहेत अशा महिलांकडून कोणत्याही प्रकारची कर वसुली करण्यात येऊ नये हीच खऱ्या अर्थाने महिला दिनानिमित्त त्यांचा सन्मान ठरेल. महत्त्वाचे म्हणजे ज्यांना आठवडी बाजाराचे ठेके दिलेले आहेत. त्यांच्या कडून या व्यवसायिकांना कोणत्याही सोयी -सुविधा पुरविल्या जात नाहीत. त्या ठिकाणची स्वच्छता ही मनपाकडूनच केली जाते अशा वेळी हे वसुली ठेके कशासाठी? असा प्रश्न निर्माण होतो. तसेच स्वयंरोजगारासाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती आणि आर्थिक मदत मिळाल्यास या महिलांचे जीवनमान आणखी सुधारू शकते.

---

# माझी बहीण, सुरक्षित बहीण अभियानांतर्गत मोबाईलच्या मदतीने महिला सुरक्षेवर सेमिनार

## जागतिक महिला दिनानिमित्त सक्षम संस्थेचा विशेष उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक महिला दिनानिमित्त सक्षम संस्थेच्या वतीने ''माझी बहीणसुरक्षित बहीण'' या महिला सुरक्षा अभियानांतर्गत शनिवार दि. ७ मार्च रोजी विशेष सेमिनारचे घेण्यात येऊन त्यात नारायण दाभाडकर व कल्याण दाभाडकर यांनी मोबाईल तंत्रज्ञानाच्या मदतीने महिलांनी स्वतःची सुरक्षा कशी वाढवावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

सेमिनारमध्ये कॉलेज, ऑफिस किंवा प्रवासादरम्यान महिलांना तसेच नागरिकांना उद्भवणाऱ्या सुरक्षेच्या समस्या लक्षात घेऊन विविध उपाययोजना सांगण्यात आल्या. सार्वजनिक ठिकाणी छेडछाड, दमदाटी किंवा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न झाल्यास एका क्लिकमध्ये नातेवाईक आणि पोलिसांना आपले लोकेशन कसे पाठवता येते, यासाठी ११२ इंडिया, गुगल मॅप्स आणि लाईफ ३६० या ॲप्सची माहिती देण्यात आली. तसेच फोन कामाच्या ठिकाणी विसरल्यास किंवा कोणी स्क्रीन उघडण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा फोटो मोबाईलद्वारे आपोआप कॅप्चर करण्यासाठी क्रॉक कॅचर आणि लॉक वॉच या ॲप्सचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. मोबाईल हरवला किंवा चोरीला गेल्यास तो शोधण्यासाठी गुगल फाईंड माय डिवाइस या सुविधेचा उपयोग कसा करावा, तसेच मोबाईल चोरी झाल्यानंतर सिमकार्ड बदलल्यास नवीन सिमचा नंबर कसा मिळवता येतो यासाठी सिम चेंज अलर्ट आणि सर्बरस अँटी थेफ्ट यांसारख्या ॲप्सची माहिती देण्यात आली.



संकटाच्या प्रसंगी मोबाईल स्क्रीन लॉक असतानाही व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यासाठी बॅकग्राऊंड व्हिडिओ रेकॉर्डर या ॲपचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात येऊन डिजिटल वेलबिंग या संकल्पनेबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. मोबाईलचा सुरक्षित, संतुलित आणि जबाबदारीने वापर करणे का आवश्यक आहे याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. तसेच कोणतीही लिंक क्लिक करण्यापूर्वी ती सुरक्षित आहे की नाही हे तपासण्यासाठी व्हायरस टोटल आणि गुगल सेफ ब्राउजिंग यांसारख्या साधनांची माहिती देण्यात आली. या वेळी सक्षम कंम्प्युटर्स चे संचालक कल्याण दाभाडकर यांनी विद्यार्थिनींना सायबर सुरक्षाबद्दल मार्गदर्शन केले व सुरक्षा उपायांची माहिती दिली तर नारायण दाभाडकर यांनी विविध मोबाईल ॲप्सचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

या सेमिनारला विद्यार्थी, महिला आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाला राजश्री गाजरे, समृद्धी जटावाले, मनस्वी यादव, साक्षी जोशी, पूजा सुरा, चंदा नाईक, अश्विनी काळे, आरती वाजे, मनीषा उजेड, दिव्या सातपुते, कृतिका राऊत, कुमुद खामगावकर, प्रतिक्षा तिर्कांडे, समिक्षा जटावाले विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

---

## जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे दोन दिवसीय जालना ग्रंथोत्सवाचे आयोजन

# १० व ११ मार्चला ग्रंथ प्रदर्शन, विक्री; महोत्सवात पुस्तकांचे प्रदर्शन आणि विक्री मुख्य आकर्षण

**जालना । प्रतिनिधी -** धावपळीच्या युगात लोप पावत चाललेली वाचन संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी आणि तिचा विस्तार करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जालना जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने येत्या १० व ११ मार्च रोजी 'जालना ग्रंथोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. टाऊन हॉलमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात होणाऱ्या या दोन दिवसीय महोत्सवात ग्रंथप्रदर्शन, साहित्यिक मेळावा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी मिळणार असल्याची माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी चंद्रशेखर ठाकूर यांनी दिली.

ग्रंथोत्सवाचा प्रारंभ मंगळवार दि.१० मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता गांधी चमन येथून निघणाऱ्या भव्य ग्रंथदिंडीने होईल. महापौर वंदना मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन होणार असून, विनीत साहनी, सुनील लोणकर आणि प्रा. पंढरीनाथ सारके यांची प्रमुख उपस्थिती असेल.

महोत्सवाचे अधिकृत उद्घाटन सकाळी ११ वाजता जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकांत पोतदार हे या सोहळ्याचे अध्यक्षस्थान भूषवतील. याप्रसंगी खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार संजय जाधव यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आमदार, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. आणि पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. ग्रंथोत्सवात विविध विषयांवर अभ्यासपूर्ण परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. मंगळवारी दुपारी ३ वाजता श्रीनिवास म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली बदलत्या काळातील वाचन संस्कृती या विषयावर चर्चा होईल. बुधवारी सकाळी ११ वाजता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे यांच्या उपस्थितीत स्पर्धा परीक्षा-काळाची गरज हा परिसंवाद रंगणार आहे. तर दुपारी ३ वाजता संतोष तांबे यांच्या अध्यक्षतेखाली ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक हे ग्रंथालय चळवळीचे योगदान या विषयावर आपले विचार मांडतील. सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल राहणार असून शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मंगळवारी दुपारी 'मी सावित्री' तर बुधवारी दुपारी 'मी धर्मवीर' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे. बुधवारी सायंकाळी ४ वाजता अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथोत्सवाचा समारोप होईल. या महोत्सवात पुस्तकांचे प्रदर्शन आणि विक्री हे मुख्य आकर्षण असणार आहे. प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने या ज्ञानयज्ञात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाने केले आहे.

---

# वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मताअभावी लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता होऊ शकत नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पॉक्सो) दाखल झालेल्या खटल्यांमध्ये, केवळ वैद्यकीय अधिकाऱ्याने लैंगिक अत्याचाराबाबत निश्चित मत दिले नाही किंवा अहवालात तसा उल्लेख केला नाही, या एकमेव कारणावरून आरोपीला निर्दोष सोडता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. पीडितेची साक्ष, परिस्थितीजन्य पुरावे आणि इतर वैद्यकीय नोंदी यांसारखे पूरक पुरावे ग्राह्य धरले पाहिजेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या निकालामुळे पॉक्सो कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल आणि पीडित बालकांना न्याय मिळण्यास मोठी मदत होईल, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केली आहे.

उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र जोशी यांच्या एकलपीठाने एका आरोपीची शिक्षा कायम ठेवताना हे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. आरोपीने असा युक्तिवाद केला होता की, वैद्यकीय अधिकाऱ्याने त्याच्या साक्षीत लैंगिक अत्याचाराबद्दल कोणतेही मत दिले नाही किंवा पीडितेच्या शरीरावर कोणत्याही जखमांचा उल्लेख केला नाही. तथापि, न्यायालयाने वैद्यकीय प्रमाणपत्राची दखल घेतली, ज्यामध्ये पीडितेच्या गुप्तांगावर लालसरपणा () आल्याची नोंद होती. न्यायालयाने म्हटले की, लैंगिक अत्याचाराव्यतिरिक्त हा लालसरपणा येण्याचे दुसरे कोणतेही कारण रेकॉर्डवर नाही. अशा परिस्थितीत, केवळ वैद्यकीय अधिकाऱ्याने मत व्यक्त केले नाही म्हणून आरोपीला निर्दोष मुक्त करता येणार नाही. वैद्यकीय अधिकाऱ्याची साक्ष ही केवळ एक तज्ञाचे मत असते आणि संपूर्ण खटल्याचा निकाल फक्त त्यावर अवलंबून असू शकत नाही. ॲड. महेश एस. धनावत यांनी या निकालाचे स्वागत करताना म्हटले की, ''उच्च न्यायालयाचा हा निर्णय पॉक्सो कायद्याच्या उद्दिष्टांना बळकटी देणारा आहे. अनेकदा वैद्यकीय अधिकारी लैंगिक अत्याचाराबाबत थेट किंवा निश्चित मत देण्यास टाळाटाळ करतात, ज्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा मिळण्याची शक्यता असते. मात्र, या निकालाने स्पष्ट केले आहे की, न्यायालयांनी केवळ तांत्रिक बाबींवर अवलंबून न राहता पीडितेची विश्वासार्ह साक्ष आणि इतर परिस्थितीजन्य पुराव्यांना महत्त्व दिले पाहिजे. पीडित बालकाची साक्ष सुसंगत असेल आणि तिला इतर पुराव्यांचा आधार मिळत असेल, तर ती शिक्षा देण्यासाठी पुरेशी आहे. यामुळे गुन्हेगारांना कायद्यातील पळवाटा शोधून सुटणे कठीण होईल.''

न्यायालयाने पुढे असेही नमूद केले की, पॉक्सो कायद्यांतर्गत बालकावरील लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात, पीडित बालकाच्या साक्षीला योग्य महत्त्व देणे आवश्यक आहे. जर रेकॉर्डवरील इतर पुरावे किंवा एकूण परिस्थिती पीडितेच्या दाव्याबद्दल कोणताही संशय निर्माण करत असेल, तरच न्यायालय सावधगिरी बाळगून इतर पूरक पुराव्यांचा शोध घेऊ शकते. या प्रकरणात, पीडितेची साक्ष तिच्या पूर्वीच्या जबाबाशी सुसंगत होती आणि तिला एका स्वतंत्र साक्षीदारासह वैद्यकीय पुराव्यांचाही आधार मिळत होता, हे रेकॉर्डवरील संपूर्ण पुराव्यांवरून दिसून येते, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात, प्रदीप बाईकर नावाच्या आरोपीने, जो पीडितेचा शेजारी होता, २२ ऑगस्ट २०१३ रोजी पीडित अल्पवयीन मुलीला काही खाद्यपदार्थ देण्याच्या बहाण्याने आपल्या घरी बोलावले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडितेने पोटदुखी असह्य झाल्याने २६ ऑगस्ट २०१३ रोजी हा प्रकार तिच्या आईला सांगितला, त्यानंतर आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सत्र न्यायालयाने त्याला दोषी ठरवून शिक्षा सुनावली होती. या शिक्षेविरोधात आरोपीने उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते, जे न्यायालयाने फेटाळून लावले आणि त्याची शिक्षा कायम ठेवली.

ॲड. धनावत यांनी शेवटी सांगितले की, ''हा निकाल न्यायव्यवस्थेचा पीडित-केंद्रित दृष्टिकोन दर्शवतो. जेव्हा एखादे बालक अत्याचाराला सामोरे जाते, तेव्हा त्याची साक्ष अत्यंत महत्त्वाची ठरते. केवळ वैद्यकीय अहवालात स्पष्ट मताचा अभाव असल्यामुळे अशा गंभीर गुन्ह्यातील आरोपी सुटता कामा नये, हा संदेश या निकालातून समाजात आणि कायदेशीर वर्तुळात गेला आहे, ही एक अत्यंत सकारात्मक बाब आहे.''

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.